दिनांक: 21 JAN 2019

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महानिर्मिती जाहिरात क्र. ०६(Jun)/२०१८ अन्वये सरळसेवेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी.**

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र. ०६(Jun)/२०१८ अन्वये कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदाच्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणानुक्रमे व अटी व शर्तीनुसार उमेदवारांनी कागदपत्रे जमा करणे व वैयक्तिक मुलाखत परीक्षा प्रक्रिया दि.१९.११.२०१८ रोजी पार पाडण्यात आली.

कागदपत्रे पडताळणीवेळी उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापर्यंत म्हणजे दि.१९.११.२०१८ रोजीच्या पूर्वी प्राप्त केलेली व कागदपत्रे पडताळणी दिवशी म्हणजे दि.१९.११.२०१८ रोजी वैध असलेली असणे आवश्यक होते. तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि.२७.०६.२०१८ पर्यंतचा धारण केलेला असणे आवश्यक होते.

सदर पदाच्या कागदपत्रे जमा करतेवेळी उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या व प्रत्यक्ष सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. केवळ उमेदवाराने सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राची पडताळणी, उमेदवार पूर्वी कार्यरत असलेल्या आस्थापनांकडून नियुक्तीपत्र देण्यापूर्वी करुन घेण्यात येईल.

त्याअनुषंगाने कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक करावे.

**कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाच्या कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी.** ↵

**सूचना** :- १) कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाची पात्र उमेदवारांची यादी ही अनुभव प्रमाणपत्र पडताळणीखेरीज प्रसिध्द करण्यात येत आहे. तथापी पात्र उमेदवारांनी सादर केलेले "अनुभव प्रमाणपत्र" पडताळणी नंतरच नियुक्ती देण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) उपरोक्त नमूद पात्र उमेदवारांमधून कल्याण अधिकारी (Welfare Officer) पदासाठीची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती